(**Permanent Unaided**)

Divisional and Deputy Director of Education, Nashik Division, Nashik

To,
Educational Officer, Primary
District Council

Educational Officer/ Administration Officer
M.N.P/ N.P. Education Department
Navi Mumbai, District-Thane

**Subject: Regarding permission to start the private Primary School in the year 2001-02.**

**Reference: Government Letter No. VLS-1002/[1187/02] PS-3.**

The Government, regarding the **Letter No. 928/03 Dt: 19/09/03** has granted permission from the academic year 2001-2002, to start the English Medium Private Unaided Primary School from 1st standard onwards starting on June 2001 to the below mentioned trust:

**Name of Institution/Organization**: Mata Amritanandmayi Math, Educational Institution, Nerul, Navi Mumbai, District- Thane.

**Name of School and Address**: Primary School (Amrita Vidyalayam), Nerul, Navi Mumbai, District- Thane.

The said permission depends on the following terms and conditions. The said Institution/School will be informed and made aware if the said terms and conditions are violated, then the permission given by the Government.

**Terms and Conditions**

2:1 The said organization should be registered under the Society Registration Act, 1860 and Mumbai Public Trustee Act, 1950.

2:2 The building of school and area should be clean and safe.

2:3 The school should appoint the necessary competent staff of academic and vocational qualification as prescribed by the governing body from time to time and subject to the prescribed pay scales and conditions of service by the government from time to time.

**Year of Permission Granted :- 2001-2002.**
**School Address :- Nerul, Navi Mumbai, District – Thane.**
**Medium :- English.**
**[Permanent Unaided)**

2:4 Financial condition of Institution, physical facilities, management facilities etc. should be suitable to run the school.

2:5 The organization should implement syllabus prescribed by the government from time to time for this school as well as provide proper offices of curriculum textbooks, assessment of school academic and co-curricular activities and provide necessary facilities for this.

2:6 The organization must keep the prescribed records for the student and staff of the school in the form of Registers.

2:7 The organization needs to keep conducive environment for learning and create constructive discipline for the students in the school, as well as reflect on the consistency and regular attendance.

2:8 In future no changes will be made in the medium & language of school other than approved by the organization.

2:9 The organization must comply with the regular government's orders/rules of procedure that are released from time to time.

2:10 The organization must ensure that other accredited primary schools in the area are not adversely affected while admitting students to the school.

2:11 If a primary school is opened in a place other than the place for which the government has given permission, then the permission given by the government will be automatically considered null and void.

2:12 If the concerned institution does not open the school in the year permitted by the Government, then it will be mandatory to apply for renewal to the competent authority (only in the approved academic year) next year or else the permission given by the government will be cancelled. An application for renewal after one year will not be considered.

3. Elected Education Officer Primary or Administration Officer / Education Officer Municipal / Municipal Education Boards that the following things should be mainly verified before granting the permission of the government to the institution.

3:1 The affiliated entities are registered under both acts. (as per 2.1)

3:2 There are no any serious complaints against the institution.

3:3 None of the other primary/secondary schools run by the Institution have been stripped of their accreditation.

3:4 There are no complaints regarding misappropriation of the said school nor any petition is pending.

3:5 The financial condition of the organization is sufficiently satisfactory.

3:6 The organization has applied in the prescribed format with a revised fee.

3:7 The society has to pay a fine of Rs 100 per academic year for keeping schools open without the permission of the government.

3:8 The organization has completed the documents for government approval within three months.

3:9 The organization is required to charge the fee in the school as per the prescribed approved academic fee payment of the government.

3:10 While approving the school of the concerned organization, the number of students (in each unit of class) in the school should be directly examined and approved.

3:11 Take a written statement that you will not start upper classes or more units or change the school's location or medium without the permission of the government and add it to the inspection report.

Fulfill the above requirements of 1 to 3 and decide to grant the permission of the government to the concerned institution. If the concerned institution is unable to comply with any of these matters, such report should be submitted to this office immediately i.e. the permission granted will be reconsidered. Further action in this matter should be taken immediately and action should be taken to approve the primary school by verifying the excess or other fulfillment of the conditions.

Site copy accepted by Deputy Director

**Cc:**

**Secretary,**
**Mata Amritanandamayi Math, Educational Institution,**
**Nerul, Navi Mumbai,**

**3 Saras Baugh, V.N. Purav Marg,**
**Devnagar, Mumbai.**

NOTARY GOVT. OF INDIA Reg. No.5873

ATTESTED BY ME **Education Department, Nashik**
**Nashik Division,**

Adv. ASHOK P. GAYKAR
B.Com., LL.B., G.D.C. & A.
NOTARY GOVT. OF INDIA
Reg. No. 5873.
6 NOV 2023

९०

३६८८३/८३

[कायम विनाअनुदानित ]

क्र शिक्षण/ प्रा.शि./ खा.प्रा.शा/ मान्य/२००१ ४३/५०२ /५५८१
विभागीय व शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग
नाशिक दिनांक

प्रति,
शिक्षणाधिकारी प्राथ.
जिल्हा परिषद

शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी
म.न.पा/न.पा.शिक्षण मंडळ नवीमुंबई जिल्हा ठाणे

विषय --- सन---------- शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु 2001–02 करण्यास परवानगी देणे बाबत.

संदर्भ :--शासन कडील पत्र क्र. व्हीएलएस–१००२/[११८७/०२]प्राशि–३ दि.

शासनाने सन २००१–०२ शैक्षणिक वर्षापासून आपले पत्र क्र. १२८/०२ दि. १९. ९. ०२ (सन---२००१-----------------------) मध्ये वरील नोंदणीकृत शैक्षणिक संस्थेला दर्शविलेल्या तुकडी इयत्ता १ ली ते---- ---- ---- पर्यंत ~~संस्थेच्या खर्चाने मराठी माध्यमाच्या~~ ~~माध्यमाद~~ (प्रवर्तन एक तुकडीत) इंग्रजी ---- माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस ~~कायम~~ विना ~~अनुदान~~ तत्वावर/प्राथमिक शाळा उघडण्यास परवानगी दिलेली आहे.

संस्थेचे नाव माताअमृतानंद मयी मठ शिक्षण संस्था नेरुळ नवी मुंबई जि. ठाणे

शाळेचे नाव व पत्ता प्राथमिक शाळा, नेरुळ नवी मुंबई जि. ठाणे.

[ अमृता विद्यालय ]

सदर परवानगी खालील शर्ती व अटीवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास वा पुर्तता न झाल्यास शासनाने दिलेली परवानगी रद्द होईल याची संबंधित संस्थेस/शाळेस कल्पना देण्यात यावी.

अटी व शर्ती

१:१ सदर संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत अथवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

१:२. शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल स्वच्छ व सुरक्षित असला पाहीजे.

१:३ शाळेत शासनाने वेळोवेळी निहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनी आवश्यक शिक्षक वर्ग व शासनाने वेळोवेळी निहीत वेतनश्रेणी व सेवाशर्ती व या अधिन राहून नेमला पाहीजे.

१:४ संस्थेची आर्थिक परिस्थिती भौतिक सुविधा व्यवस्थापन विषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालण्यासाठी समाधान असणे आवश्यक आहे

शाळा परवानगी वर्ष :- २००१–२००२
शाळेचे ठिकाण :- नेरुळ, नवी मुंबई जि. ठाणे.
माध्यम :- इंग्रजी.

[ कायम विना अनुदानित ]

NOTARY GOVT. OF INDIA A.P. GAYKAR Mumbai Regd. Exp. Dt. 12/5/28

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने मंजूर केलेला विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम पाठ्यपुस्तक, मूल्यमापन पद्धती शासन व प्राथमिक शिक्षण आणि योग्य साधनांचा वापर केला पाहिजे व त्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया पाळल्या पाहिजेत.

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेल्या व शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणाकरिता ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांच्या विधायक शिस्त निर्माण करणे तसेच व्यक्तिमत्त्व आणि नियमित उपस्थिती इत्यादी गोष्टी त्यांच्याबाबत नियमांनी आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम शाळेची भाषा इत्यादी बाबी परवानगीशिवाय कोणतेही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे/कार्यपद्धतीचे नियमित पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरू न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम प्राधिकाऱ्याकडे (परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात) करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नूतनीकरणासाठी केलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

३ संबंधित शिक्षणाधिकारी प्राथमिक वा प्रशासन अधिकारी /शिक्षणाधिकारी नगरपालिका/ महानगर पालिका शिक्षण मंडळे यांनी शासनाची परवानगी संस्थेस कळविण्यापूर्वी खालील बाबी प्रामुख्याने पडताळून पहाव्यात.

३.१ संबंधित संस्था नोंदणी कायद्याखाली नोंदणीकृत आहे. (२.१ प्रमाणे)

३.२ संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३.३ सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/ माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

३.४ संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

~~३.५ संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक आहे.~~

३.६ संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केलेला आहे.

३.७ शासनाची परवानगी नसताना शाळा चालू ठेवल्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

३.८ संस्थेने सर्वांसाठी शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात केली आहे.

३.९ संस्थेने पालकांकडून शासनाच्या विहित मान्य शैक्षणिक शुल्क व्यतिरिक्त शुल्क आकारणे आवश्यक आहे

३.१० संबंधित संस्थेच्या शाळेस मान्यता देतांना शाळेत सुरू असलेले वर्ग (प्रत्येकी तुकडी) त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करून मान्यता प्रदान करावी.

३.११ शासनाच्या परवानगी शिवाय नवे वर्ग व जादा तुकड्या सुरू करण्यात नाहीत व शाळेची जागा व माध्यम बदलणार नाही असे लेखी निवेदन घ्यावे व ते तपासणी अहवालास जोडावे.

वरील १ ते ३ मधील बाबींची पूर्तता करून शासनाची परवानगी संबंधित संस्थेस कळविण्याचा निर्णय घ्यावा. वर नमूद बाबींची पूर्तता करण्यास संबंधित संस्था असमर्थ ठरल्यास त्याबाबत तसा अहवाल या कार्यालयास तातडीने सादर करावा म्हणजे दिलेल्या परवानगी बाबत फेरविचार करण्यात येईल. तर या प्रकरणी पुढील कार्यवाही तात्काळ करून अर्ज व शासनाच्या अटी पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करून सदर प्राथमिक शाळांना मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

स्वाक्षरित शिक्षण उपसंचालकांसाठी

प्रत : सेक्रेटरी, मान्य केली,
माता अमृतानंदमयी मठ शिक्षण संस्था, नेरूळ नवी मुंबई.
३ सारसबाग, व्ही. एन पुरव मार्ग
देवनार मुंबई.

शिक्षण उपसंचालक
नाशिक विभाग, नाशिकरोड

जावक लिपिक
शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग
यांचे कार्यालय, नाशिकरोड

NOTARY
A.P. GAYKAR
Mumbai
Maharashtra
Reg. No.5873
Exp. Dt.
12/5/28
GOVT. OF INDIA

भारत सरकार
O.I.G.

500
INDIA

## नमुना दोन

जाक्र ठाजिप/शिक्षण/प्राथ/प्रास-२/वशी - ९८४ / २०२४
शिक्षण विभाग (प्राथ.) जि.प. ठाणे
दिनांक :- 20/03/2024

प्रति,

व्यवस्थापक :- माता अमृत नंदमयी मठ
दुरध्वनी :- ०२२-२७७१६१४०
ई मेल :- info@avnavimumbai.com

**विषय:** - बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम, ११ पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

**संदर्भ :-** १) शिक्षणाधिकारी नवीमुंबई महानगरपालिका, शिक्षण विभाग, नवीमुंबई जि.ठाणे यांचेकडील जाक्र.नमुंमपा/शि.वि./४६९/२०२४ दि.६/२/२०२४ रोजीचा प्रस्ताव.

आपल्या दि. ६/२/२०२४ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला/ पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी याआधारे.

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद ठाणे **दि.१/४/२०२२** पासुन ते **दि. ३१/३/२०२५** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इ.१ ली ते इ. ७ वी** करिता माता अमृतनंदमयी मठ संचलित, अमृता विदयालय, (सीबीएसई) प्लॉट नं.४, सेक्टर २५, जुईनगर (प.) नवी मुंबई जि. ठाणे. (शाळेचे नाव, पत्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११(जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.

३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना ,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील त्या विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यत प्रवेश देईल आणि प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निदिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतीपूर्ती मिळण्यासाठी शांळेला स्वतंत्र बॅक खाते देण्यात येईल.

५. संस्था/ शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन ) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्रारंभिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांक/ विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

CBSE AFFLN NO. 1130190 AMRITA VIDYALAYAM JUINAGAR

PRINCIPAL Amrita Vidyalayam CBSE AFFILIATION No. 1130190 Plot No. 4, Sector - 25, Juinagar (W), Navi Mumbai - 400 705

८. शाळा समूचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमांचे पालन करील.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या-:

| | |
|---|---|
| * शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | :- ३५००.०६ sq.m. |
| * एकुण बांधकाम क्षेत्र | :- ५३४५.५१ sq.m. |
| * खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | :- ३८०१.४२ sq.m. |
| * वर्ग खोल्या संख्या | :- ४२ |
| * कार्यालय- नि-भांडार-नि- मुख्याध्यापकाची खोली | :- ७ |
| * मुलांसाठी व मुलींसाठीह स्वतंत्र प्रसाधनगृहे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.- | :- आहे |
| * पिण्याच्या पाण्याची सुविधा | :- आहे |
| * दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | :- लागू नाही |
| * अध्यापन अध्ययन साहित्य/ खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता | :- आहे |
| * वाचन साहित्य विनासायास उपलब्ध. | :- आहे |

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्याच्या विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०(१८६०चा २१) किंवा मुंबई सार्वजनीक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक TH- NMMC-P- 37 असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

मुख्याध्यापक, माता अमृत नंदमयी मठ संचलित, अमृता विदयालय ( सीबीएसई ), प्लॉट नं.२५, सेक्टर-४, जुईनगर (प.), नवी मुंबई, ठाणे यांनी त्यांच्या शाळेस आरटीई पुनर्मान्यता नमुना नं.२ मिळणेबाबत प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रकांबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार उदभवल्यास अथवा खोटी व दिशाभूल करणारी कागदपत्रक आढळून आल्यास या कार्यालयाकडुन देण्यात आलेले आरटीई पुनर्मान्यता नमुना नंबर २-रद्द समजण्यात येईल.

( बाळासाहेब राक्षे )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद ठाणे

CBSE AFFLN NO. 1130190 AMRITA VIDYALAYAM JUINAGAR

PRINCIPAL
Amrita Vidyalayam
CBSE AFFILIATION No. 1130190
Plot No. 4, Sector - 25,
Juinagar (W),
Navi Mumbai - 400 705.